ePaper
माझी अंत्ययात्रा नाहीतर आरक्षणाची विजययात्रा:जरांगे पाटील



| वर्ष - 7 | अंक - 124 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- विश्वचषकासाठी टीम इंडिया सज्ज!
- कल के अंधेरो से निकल के
- गधे खा रहे च्यवनप्राश!
- जरांगे पाटील आंदोलनावर ठाम!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 6 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# गणेश मंडळांसाठी 'गुड न्यूज'!

## यंदा मंडप शुल्क नाही : माजी उपमहापौर शैलजा मोरे यांच्या मागणीला यश

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवडमध्ये महापालिका प्रशासनाकडून सुरू असलेली उपयोगकर्ता शुल्काची दंड वसुलीला अखेर स्थगिती मिळाली आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमध्ये याबाबत सविस्तर बैठक घेण्यात येईल आणि तोपर्यंत ही वसुली थांबवावी, असा मोठा निर्णय कॅबिनेट मंत्री डॉ. उदय सामंत यांनी घेतला. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळाला आहे.**



माजी उपमहापौर शैलजा मोरे व सिंधूनगर युवक मित्र मंडळ कार्याध्यक्ष अरुण थोरात यांच्या मागणीस यश आले असून, पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव २०२३ या कालावधीसाठी सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात उभारणी केलेले मंडप/स्टेज, कमान यांचे परवाना शुल्क माफ करण्याचा निर्णय पिंपरी चिंचवड महापालिकेने घेतला असून तसा आदेश महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी निर्गमित केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत गणेश मंडळांना मंडप भाडे आकारण्यात येऊ नये, असा निर्णय झाला होता. ठाणे महापालिकेत या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झाली. मात्र, पिंपरी चिंचवड महापालिकेने त्याची अंमलबजावणी कार्यक्षेत्रात केली नव्हती. याबाबत माजी उपमहापौर शैलजाताई मोरे व सिंधूनगर युवक मित्र मंडळ कार्याध्यक्ष श्री अरुण थोरात यांनी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. मंडप शुल्क रद्द करण्याची मागणी त्यांनी केली होती. त्याची दखल महापालिकेने घेतली आहे. त्यामुळे शहरातील गणेश मंडळांना दिलासा मिळाला आहे. त्याबद्दल महापालिकेचे त्यांनी आभार मानले आहेत.



"गणेशोत्सव हा पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात साजरा होतो. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर गणेश मंडळांचे कार्यकर्ते मोठे परिश्रम घेत असतात. हा सार्वजनिक महोत्सव असल्यामुळे त्यासाठी कोणतेही शुल्क मंडळांकडून घेऊ नये अशी मी मागणी केली होती. त्याबाबत महापालिकेने सकारात्मक निर्णय घेतला आहे. तसा आदेश आयुक्तांनी काढला आहे.

**– शैलजा मोरे,** माजी उपमहापौर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून सन २०२२ ते सन २०२६ या कालावधीकरिता गणेश उत्सव, नवरात्र उत्सव व सार्वजनिक धार्मिक कार्यवाहीसाठी सार्वजनिक मंडळे यांना मंडप, स्टेज, स्वागत कमान इ. साठी परवानगी देण्याबाबत परिपत्रक निर्गत करण्यात आले आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव २०२३ साठी पालिकेच्या जागेवर मंडप/स्टेज व कमानीसाठी परवाना शुल्क चालू आर्थिक वर्ष सन २०२३ करिता माफ करण्यास मान्यता दिली असून, सन २०२३ सालाकरिता वसुल करण्यात आलेल्या शुल्काची संपुर्ण रक्कम संबंधित मंडळांना परत करण्यात यावी, असे आदेशात आयुक्तांनी म्हटले आहे.

# महापालिका शिक्षकांनी गुणवंत विद्यार्थी घडवावेत!

## शंकर जगताप यांचे आवाहन : धन्वंतरी योजना लागू, शिक्षक संघटनांनी मानले आभार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तंमहापालिका विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे. मात्र, त्यांना चांगल्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. शिक्षक दिनाच्या निमित्ताने महापालिका प्राथमिक शिक्षक आणि सेवानिवृत्त शिक्षकांना 'धन्वंतरी' आरोग्य योजना लागू झाली. शिक्षकांनी आगामी काळात गुणवंत विद्यार्थी घडवण्यासाठी कर्तव्यनिष्ठ रहावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.**



अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला महापालिका प्राथमिक शिक्षक आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना धन्वंतरी आरोग्य योजनेचा लाभ देण्याचा निर्णय अखेर महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षक आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. याबाबत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी शिक्षक संघटनांच्या वतीने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. महापालिका भवन येथे शिक्षक संघटना आणि प्रशासनाची बैठकीत धन्वंतरी योजना लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्या निमित्त शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींनी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची कृतज्ञता भेट घेतली आणि या प्रश्नासाठी पाठपुरावा केल्याबद्दल आभार व्यक्त केले. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष संजय येणारे, अनुसूचित जमातीचे शिक्षक संघटनेचे अध्यक्ष विलास अंभोरे, पिंपरी-चिंचवड मनपा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे सभापती शिवाजी दौंडकर, प्राथमिक शिक्षक परिषदेचे सरचिटणीस मंगेश भोंडवे यांच्यासह सतीश ढमाळ, सतीश गिड्डे, गोरक्षनाथ भांगरे, धर्मेंद्र भंगे, बिभीषण फलफले, शांताराम रोकडे, अनिल सुकाळे, चौगुले सर, शंकर पवार, बाबुराव लांघी आदी मान्यवर उपस्थित होते. पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे प्राथमिक शिक्षण विभागाकडील कार्यरत शिक्षक / सेवानिवृत्त शिक्षकांना कार्यरत शिक्षकास ३०० रुपये व सेवानिवृत्त शिक्षकांस १५० रुपये मासिक सभासद वर्गणी कपात करण्यात येईल. त्याआधारे संबंधित कर्मचाऱ्यांना धन्वंतरी योजनेचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

"पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या शिक्षकांना धन्वंतरी योजनेचा लाभ मिळावा. यासाठी लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी सकारात्मक भूमिका घेतली होती. मात्र, हा प्रश्न तांत्रिक कारणास्तव मागे पडला होता. आता शिक्षक संघटनांनी आंदोलनात्मक पवित्रा घेतल्यामुळे महापालिका प्रशासनाला पत्राद्वारे मागणी केली. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय या धोरणाप्रमाणे महापालिका प्राथमिक शिक्षक आणि सेवानिवृत्त अधिकारी- कर्मचाऱ्यांना धन्वंतरी योजना लागू केली आहे.

**– शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.


# झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपड्पट्टीधारकांना 670 सदनिका

## मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटनेंची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेअंतर्गत निगडी येथील शरदनगर व आकुर्डी येथील दुर्गानगर येथील 670 झोपडीधारक सभासदांच्या पुनर्वसन सदनिकांचा लोकार्पण सोहळा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते सपन्न झाला.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटने, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे पदाधिकारी, अधिकारी, मे. रेन्बो डेव्हलपर्सचे रवी जैन, लाभार्थी आदी उपस्थित होते. शरदनगर येथे 315 आणि दुर्गानगर येथे 355 अशा एकूण 670 सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्याचा लाभ झोपडीधारकांना होणार आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण दोन मिश्र इमारती (पुनर्वसन घटक + विक्री घटक) बांधण्यात आल्या आहे. दोन्ही इमारतीमध्ये सामाईक क्षेत्राला वीजपुरवठ्यासाठी सौरपॅनेलद्वारे वीजनिर्मिती करण्यात येणार असून प्रत्येक मजल्यावर सुरक्षा जाळी, प्रत्येक सदनिकेच्या खिडक्यांना व



स्वच्छता गृहांना डास प्रतिबंधक जाळी बसविण्यात आली आहे.

पुनर्वसन प्रकल्पात कनव्हेयंस दुकाने तयार करण्यात आली असून त्यामधून मिळणारे उत्पन्न सोसायटीच्या देखभाल दुरुस्तीसाठी वापरण्यात येणार आहे. पुनर्वसन इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे योजनेमध्ये किंडरगार्डन, कम्युनिटीहॉल, प्रति इमारत 4 लिफ्ट, अग्निशमन यंत्रणा, पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याची सुविधा, ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प, एसटीपी (सीवेज ट्रीटमेंट प्लांट), जनरेटर बॅकअप, खुलीजागा, बाग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, 2 अंतर्गत रस्ते, ट्यूबलाईट, फॅन, एक्झॉस्ट फॅन आदी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या बीएसयुपी व अन्य योजनांतर्गत यापूर्वी लाभ दिलेल्या लाभार्थ्यांव्यतिरिक्त अन्य पात्र लाभार्थ्यांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मार्फत 300 चौ. फूट (27.88चौ.मी.) चटईक्षेत्र असलेली सदनिका विनामूल्य पुरविण्यात येते.

1 जानेवारी 2000 नंतरच्या मात्र 1 जानेवारी 2011 पूर्वीच्या पात्र झोपडीधारकाना सशुल्क 2 लाख 50 हजार रुपये प्रती सदनिकाप्रमाणे पुनर्वसन सदनिका देय आहे. झोपडीधारकांची सहकारी संस्था नोंदणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सहकार विभागामार्फत करण्यात येते.

### तातडीने पात्रता याद्या तयार

» झोपडीधारक व विकसकांनी नवीन प्रकल्प पाहून त्यासारखाच झोपडपट्टीच्या ठिकाणी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यासाठी नियोजन करावे. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे पूर्ण सहकार्य राहील. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रातील झोपडीधारकांनी पुनर्वसन प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे. त्यासाठी तातडीने पात्रता याद्या तयार करण्यासाठी व पात्र धोपडीधारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी प्राधिकरणाकडे संपर्क साधावा, असे आवाहन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटने यांनी केले.

# व्यावसायिक कुशलता वृद्धिंगत करा : माशेलकर

## तंत्रज्ञान, विश्वास, प्रतिभा या त्रिसूत्रीचा वापर करण्याचे आवाहन

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तंत्रज्ञान, विश्वास, प्रतिभा या त्रिसूत्रीचा वापर करून आपल्या अंगी व्यावसायिक कुशलता वृद्धिंगत होण्यासाठी उपयोग करण्याचे आवाहन पदमविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले. 18 वा महाराष्ट्र राज्य पोलिस कर्तव्य मेळाव्याचे उद्घाटन मंगळवारी राज्य राखीव पोलिस दल गट क्र. 2 पुणे येथील परेड मैदानावर डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.**

स्पर्धेत सहभागी 24 संघांनी शिस्तबद्ध संचलन करुन प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. गतवर्षीच्या 66 वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळाव्यामध्ये



पदक विजेत्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा डॉ. माशेलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रशांत बुरडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते गतवर्षीच्या 66 वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये पदक विजेत्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुण्यांनी स्पर्धकांना व उपस्थितांना टेक्नॉलॉजी, ट्रस्ट, टॅलेंट या त्रिसुत्रींचा आपल्या अंगी व्यावसायिक कुशलता, वृद्धींगत होण्यासाठी उपयोग करण्याचे आवाहन केले.

तसेच स्पर्धकांना निकोप व खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा पार पाडण्याविषयी मार्गदर्शन करून आगामी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याकरिता शुभेच्छा दिल्या. 66 व्या अखिल भारतीय कर्तव्य मेळाव्यामध्ये सुवर्ण पदक प्राप्त करणाऱ्या श्रीकृष्ण गोविंद गवस, पोलिस उप निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांना उद्घाटन ज्योत आणण्याचा मान देण्यात आला व त्यांनी स्पर्धकांना शपथ दिली. सदर कार्यक्रमास प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक सीआयडी, सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, डॉ. दिलीप पाटील-भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, सीआयडी, संजय येनपुरे, विशेष पोलीस महानिरीक्षक, सीआयडी, अशोक मोराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, एस. आर.पी.एफ. पुणे, रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त, पूर्व विभाग, पुणे शहर, नामदेव चव्हाण, पोलीस उप महानिरीक्षक, सारंग आवाड, पोलीस उपमहानिरीक्षक, प्रशासन, पंकज देशमुख, पोलीस अधिक्षक, , नम्रता पाटील, समादेशक, एस. आर.पी.एफ., गट क्र.2, दिनेश बारी, पोलीस अधिक्षक, मनिषा दुबुले, पोलीस अधिक्षक, पल्लवी बर्गे, पौर्णिमा तावरे, अपर पोलीस अधिक्षक, एम. आय. ए., पुणे तसेच गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य राखीव पोलीस दल व एम.आय.ओ. येथील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा

» मेळाव्यामध्ये पदक विजेत्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी स्पर्धकांना व उपस्थितांना टेक्नॉलॉजी, ट्रस्ट, टॅलेंट या त्रिसुत्रींचा आपल्या अंगी व्यावसायिक कुशलता, वृद्धींगत होण्यासाठी उपयोग करण्याचे आवाहन केले. तसेच स्पर्धकांना निकोप व खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा पार पाडण्याविषयी मार्गदर्शन करून आगामी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याकरिता शुभेच्छा दिल्या. मेळाव्यामध्ये सुवर्ण पदक प्राप्त करणाऱ्या श्रीकृष्ण गोविंद गवस, पोलिस उप निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांना उद्घाटन ज्योत आणण्याचा मान देण्यात आला व त्यांनी स्पर्धकांना शपथ दिली.

# बांधकाम व्यावसायिकांना प्रशासनाचे ‘अभय’!

## सोसायट्यांचा पाणी प्रश्न पेटणार : ‘त्या’ बिल्डरांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

- हाऊसिंग सोसायटी फेडरेशचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांची मागणी
- सोयायट्यांच्या पाणीप्रश्नी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन





“ शहरातील बहुतेक बांधकाम व्यवसायिकांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये स्वखर्चाने पाणीपुरवठा करेल अशा लिहून दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन केलेले आहे. याबाबत आम्ही वारंवार आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना अवगत केलेले आहे. तरीदेखील प्रशासनाकडून अशा सर्व बांधकाम व्यवसायिकांना पाठीशी घातले जात आहे .प्रशासन आणि बांधकाम व्यावसायिक यांच्याकडून संगणमताने आमची पिळवणूक चालू आहे.

**- संजीवन सांगळे,** अध्यक्ष, चिखली-मोशी- पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी मनपाला त्यांच्या गृहप्रकल्पास बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेताना सोसायटीधारकांना ते “स्वखर्चाने पाणीपुरवठा करतील” असे शपथेवर लिहून दिले आहे. मात्र, सोसायटीधारकांना स्वखर्चाने पाणी न पुरवता लिहून दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन केले जात आहे. अशा बांधकाम व्यावसायिकांवर भारतीय दंड संहिता कलम 200 नुसार फौजदारी गुन्हे दाखल करावे, अशी मागणी चिखली-मोशी-चऱ्होली- पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये आयुक्त दालनात फेडरेशनचे पदाधिकारी आणि आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत दि.३० ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या बैठकीचा संदर्भ देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील बांधकाम व्यावसायिक हे त्यांच्या गृहनिर्माण प्रकल्पांना भाग पूर्णत्वाचा दाखला घेताना तसेच पूर्णत्वाचा दाखला घेताना हे विकसक सोसायटी धारकांना स्वखर्चाने पाणीपुरवठा करतील असे शपथेवर हमीपत्र लिहून देऊन बांधकाम पूर्णत्वाचे दाखले घेतात. परंतु, त्यानंतर एकही बांधकाम व्यावसायिक सदनिकाधारकांना त्यांच्या स्वखर्चाने पाणी पुरवत नाहीत. उलट सदनिकाधारकांच्या कडून घेतलेल्या आगाऊ देखभाल खर्चातूनच हा खर्च करतात.

भारतीय दंड संहिता कलम 200 नुसार जर एखाद्या नागरिकांने किंवा एखाद्या कंपनीच्या समूहाने किंवा एखाद्या व्यावसायिकाने शपथेवर लिहून दिलेल्या हमीपत्राचे उलंघन केले तर हा भारतीय दंड संहिता कलम 200 नुसार गुन्हा आहे.

तसेच, हमीपत्रा व्यतिरिक्त सदनिका धारकाची फसवणूक करण्यासाठी हे बांधकाम व्यावसायिक ग्राहकांकडून त्यांच्या करारनाम्यामध्ये सदनिकाधारक विकत घेतल्या जाणाऱ्या पाण्याचा खर्च स्वतः करतील असा कुठलाही उल्लेख करणार नाहीत असे देखील या लिहून घेणाऱ्या हमीपत्र मध्ये स्पष्टपणे उल्लेख करावा आणि नागरिकांची आणि पिंपरी चिंचवड मनपाची होणारी फसवणुकीला आळा घातला पाहिजे.

ज्या बांधकाम व्यावसायिक यांनी बांधकाम पूर्णत्वाचे दाखले घेताना स्वतः स्वखर्चाने आम्ही सदनिकाधारकांना पाणीपुरवठा करतील असे हमीपत्र लिहून दिलेले आहे त्यांना हमीपत्रानुसार सोसायटी धारकांना पाणी पुरवण्याचे आदेश दिले पाहिजेत, असेही सांगळे यांनी म्हटले आहे.

---

# शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ‘धन्वंतरी’चा लाभ!

## शिक्षक दिनी आयुक्त शेखर सिंह यांची ‘भेट’ : आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षण विभागात काम करणारे प्राथमिक शिक्षक आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना धन्वंतरी आरोग्य योजनेचा लाभ देण्याचा निर्णय महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतला. त्यामुळे शिक्षक दिनाच्या पूर्वसंधेलाच शिक्षकांना अनोखे ‘गिफ्ट’ मिळाले.**

गेल्या आठ- दहा वर्षांपासून महापालिकेतील प्राथमिक शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना अन्य विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे ‘धन्वंतरी’ योजना लागू करावी. यासाठी शिक्षक संघटनांनी मागणी लावून धरली होती. याबाबत आयुक्त शेखर सिंह आणि संघनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घ्यावी आणि सकारात्मक तोडगा काढावा, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. दरम्यान, महापालिका भवन येथे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी शिक्षक संघटना आणि शिक्षण व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजय खोराटे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र वादेवार, पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे, शिक्षक संघटनेचे प्रा. मनोज मराठे आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या इतर विभागातील कर्मचारी/ अधिकारी यांच्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण विभागाकडील कार्यरत शिक्षक / सेवानिवृत्त शिक्षकांना कार्यरत शिक्षकास ३०० रुपये व सेवानिवृत्त शिक्षकांस १५० रुपये मासिक सभासद वर्गणी कपात करण्यात येईल. त्याआधारे संबंधित कर्मचाऱ्यांना धन्वंतरी योजनेचा लाभ देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी २०१३ च्या धन्वंतरी स्वास्थ योजनेच्या धोरणामध्ये बदल करणेकामी वैद्यकीय विभागामार्फत मा. स्थायी समिती, मा. महापालिका सभा यांची मान्यता घेण्याकामी कार्यवाही प्रस्तावित करावी, असे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत.

“ महापालिका शिक्षकांना धन्वंतरी योजनेचा लाभ मिळावा. या करिता गेल्या आठ ते दहा वर्षांपासून शिक्षक संघटना मागणी करीत आहेत. याबाबत अनेकदा प्रशासनाकडे आम्ही पाठपुरावा केला आहे. शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर सर्व शिक्षक आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महापालिका प्रशासनाकडून ‘गिफ्ट’ मिळाले असून, यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि सहकाऱ्यांचे मी आभार व्यक्त करतो. तसेच, महापालिका शिक्षक आणि सेवानिवृत्तांचे अभिनंदन करतो.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

# भारतीय विद्यार्थ्यांचा ‘धर्म’ कोणता?



## भूमिका

**काही दिवसांतल्याच दोन बातम्या. एक : अठरा वर्ष निष्कलंक सेवा (प्राचार्यांच्याच मतानुसार) देणाऱ्या एका अधिव्याख्यात्यांना पुण्यातील एका प्रतिष्ठित कॉलेजनं निलंबित केलं. का? विद्यार्थ्यांच्या ‘अभाविप’ या संघटनेनं एका व्हिडीओआधारे त्यांच्याविरुद्ध निदर्शनं केली आणि पोलिसात तक्रारही; तक्रार काय?**

बातमीनुसार ‘विविध धर्मातील ईश्वर हा अखेर एकच आहे’ असं ते शिकवताना म्हणाले! दुसरी बातमी : एका शैक्षणिक कार्यक्रमातच बारावीच्या विद्यार्थ्यांसमोर बोलताना केरळ विधानसभा सभापती म्हणाले : विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक वृत्ती अंगी बाणवावी; रामायणातील पुष्पक विमान, गणपतीचं हत्ती-मुख (प्लॅस्टिक सर्जरी) वगैरे गोष्टींकडे वैज्ञानिक सत्यं म्हणून न पाहाता मिथकं म्हणून पाहावं. भाजप, विहिंप, नायर सेवा सो., आदी संघटनांनी सभापतींकडून माफीची मागणी करून आंदोलनाचा इशारा दिला! विषय कोणताही असो; समाजाला सत्ताकारणी खेळाच्या हातातलं बाजूचं वा विरोधाचं बाहुलं बनवणं हा लोकशाहीचा अर्थ बनत आहे. विद्यार्जनही त्यातून सुटत नाही ही बाब कमालीची चिंताजनक आहे. हे सारं कालपर्यंत कोणाला वाटलं आणि आज कोणाला वाटतंय हे गौण, परिणाम अखेर भोगतो तो समाजच. मात्र या खेळात समाज जेव्हा समतोल विचारबुद्धी गमावून



बसतो तेव्हा कोणत्याही वैचारिक मांडणीला खरं तर काही अर्थ उरत नाही; ती फक्त नव्या आरोप-प्रत्यारोपांना केवळ आमंत्रणच ठरते. तरीही वरील दोन्ही घटनांतील व एकंदरीतच विद्यार्थिवर्ग तसंच आपणा सामान्य धार्मिकांपैकीही ज्यांना ‘आता आपल्याला धर्मासंबंधी शिकण्यासारखं काहीही उरलेलं नाही’ असं वाटत नसेल, त्यांच्याशी संवादाचा हा प्रयत्न. अशा सर्व वादांत मूळ प्रश्न : काय आहे भारताचा धर्म आणि ईश्वर? ‘ईशावास्यमिदं सर्वं..’ ( ईश्वर-तत्त्व विश्वातील कणाकणाला व्यापून आहे : ईशावास्य उपनिषद). पण सव्वाशे वर्षांपूर्वी जग कुठे होतं? “धर्माला आज एक प्रकारे राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.. (परंतु) आजच्या आधुनिक मानवासाठी धर्म जर तर्कसंगत व बुद्धीचे समाधान करणारा नसेल तर तो नकोसा होईल.. सत्यापर्यंत पोहोचावयास बुद्धी पूर्णत: समर्थ नसेल तरीही धर्माचार्यांवर वा वीस लाख देवतांवर आंधळेपणाने विश्वास ठेवण्यापेक्षा दुबळया का होईना पण आपल्या बुद्धीचे अनुसरण करून नास्तिक झालेले परवडले..” कोण म्हणतं? अर्थातच स्वामी विवेकानंद. “धर्म विज्ञानाला सामोरा जायला तयार नसेल तर त्याच्या लौकरात लौकर मरणातच मानव जातीचं कल्याण आहे” हे त्यांचे शब्द तर लाटांबरोबर वाहत न जाता आयुष्यभर शिकू पाहणाऱ्या आपण सर्वच सामान्य धार्मिकांनी (‘निधर्मी’नीही का नको?) हृदयावर कोरून ठेवायला हवेत. पण कशी बरं एवढी हिंमत स्वामीजींची? त्यामागे पतनावस्थेपूर्वीच्या भारताची महान ज्ञान-परंपरा आहे. भारतीय धर्म-संस्कृतीचा निर्विवादपणं पाया असलेल्या उपनिषदांचा काळ हा वैचारिक, आध्यात्मिक आंदोलनांचा काळ मानला जातो. स्वर्गसुखासहित कशाचीही स्पृहा नसलेल्या उपनिषदकारांची सत्यशोधनासाठी कोणत्याही त्यागाची तयारी होती. का? उपनिषदकार बेभानपणं शोध घेत होते एकाच प्रश्नाचा : ‘कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञात भवति’ (वस्तुमात्राच्या आतील एकत्व कोणतं?- म्हणूनच ‘न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते’ हा तर गीतेचा घोषमंत्रच!) का घडू शकलं हे इथे? स्वामीजी म्हणतात, ‘वेदान्त हा सर्वात धाडसी धर्म आहे.. सत्याच्या शोधात त्याची कोठेच थांबायची तयारी नाही. त्यांना प्रतीत झालेले सत्य सांगण्याविरुद्ध उपनिषदकारांची मुस्कटदाबी करून त्यांचा मार्ग रोखायला त्या वेळी तिथे पुरोहितवर्ग नव्हता.. इथे खुळचट बंधने सामाजिक बाबतींत, धार्मिक सत्यशोधनात नाहीत.. इथे चार्वाक तर देवळादेवळांतून शहराशहरांतून अगदी नागडया सोलीव जडवादाचा (निरीश्वरवाद) उघड उघड प्रचार करीत हिंडले, पण त्यांच्या केसालाही कोणी धक्का लावला नाही.’ वडिलांना निरोप द्यायला गेलेल्या दहा-बारा वर्षांच्या अष्टावक्रानं (त्याच्या आठ कुबडांकडे पाहून सभागृह हसल्यावर) भर विद्वत्सभेत जनकासमोरच सिंहगर्जना केली : ‘चामडीवरून माणसाची पारख करणाऱ्या चामडय़ांच्या व्यापाऱ्यांकडून (सभेतील विद्वान) निराकार अविनाशी आत्म्याचं ज्ञान मिळवू पाहाणाऱ्या जनकराजाला, ईश्वरा, वाचव रे बाबा!.

## संपादकीय »

### वीजवंचनेचे वास्तव!

***धार्मिक मानापमान, एक देश एक निवडणूक, ‘इंडिया’चे ‘एनडीए’स आव्हान आहे किंवा काय इत्यादी मौलिक चर्चा मनोरंजक खऱ्या.***

धार्मिक मानापमान, एक देश एक निवडणूक, ‘इंडिया’चे ‘एनडीए’स आव्हान आहे किंवा काय इत्यादी मौलिक चर्चा मनोरंजक खऱ्या. समाजमाध्यमी विद्वान सोडले तरी या गहन विषयांवर ज्ञानामृत पाजणारे शंभरभर कोट तज्ज्ञ आपल्याकडे असतील. त्या सर्वांस वंदन करून या महत्त्वाच्या विषयांखेरीज अन्य एका विषयाकडे लक्ष वेधणे आवश्यक वाटते. वास्तविक या विषयाची बातमी ताजी आहे.

परंतु वर उल्लेखिलेल्या महत्त्वाच्या विषयांच्या भाऊगर्दीत या तुलनेने कमी आकर्षक विषयांकडे दुर्लक्ष झाले असण्याची शक्यता आहे. हा मुद्दा आहे विजेच्या भारनियमनाचा. ऐन श्रावणात आपल्या प्रगत महाराष्ट्रासह अन्य काही तितक्याच प्रगत-अप्रगत राज्यांतील नागरिकांवर भारनियमनाचे संकट ओढवलेले आहे.

**चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांचा पाहुणचार करण्याची संधी येत्या जी-२० परिषदेच्या निमित्ताने भारताला मिळणार होती, ती आता हुकली. वेगवेगळय़ा स्रोतांकडून जिनपिंग यांच्या संभाव्य अनुपस्थितीविषयी वार्ता गेले काही दिवस धडकत होत्या. त्यांवर सोमवारी शिक्कामोर्तब झाले इतकेच.**

## अनुपस्थिती की पळवाट ?

एका अर्थाने भारतीय परराष्ट्र खात्याचे अधिकारी यानिमित्ताने आनंदूनही गेले असतील. कारण बाली, समरकंद, जोहान्सबर्ग या तीन ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जिनपिंग समक्ष भेटले होते. पण दोघांमध्ये कसल्याही प्रकारचा स्नेह तर सोडाच, संवादही झाल्याचे दिसून आले नाही. हे असले अवघडलेपण नवी दिल्लीतही दिसले असते आणि नंतर काही तरी सारवासारव करत बसावी लागली असती. त्या अग्निपरीक्षेतून सुटका झाली, ही परराष्ट्र आणि शिष्टाचार खात्याच्या अधिकाऱ्यांसाठी सुखावणारी बाबच. जिनपिंग येणार नाहीत आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिनही फिरकणार नाहीत. त्यामुळे युक्रेनच्या मुद्दय़ावर जगात दोन स्पष्ट तट पडले असताना, त्यांतील एकाचे प्रतिनिधित्व या परिषदेत दिसणार नाही. शिवाय या दोन तटांना सांधण्याची जबाबदारी निभावण्याची मोदी यांची तयारी सुरू होती. कारण रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांशी




संवाद कायम ठेवलेल्या जगातील मोजक्या प्रमुख देशांपैकी आपण एक. पण आपली ही संधी जिनपिंग यांच्या अनुपस्थितीने हिरावल्यासारखी झाली. जी-२० गटाची स्थापनाच मुळात आर्थिकदृष्टय़ा प्रगत देश आणि प्रगतिशील देश यांच्यात संवादसेतू निर्मिण्याच्या गरजेतून निर्माण झाली. भारताचे परराष्ट्रधोरण तटस्थ आणि स्वतंत्र असल्याचे आपण गृहीत धरतो. परंतु जिनपिंग आणि पुतिन यांच्या अनुपस्थितीमुळे धोरणात्मक मतैक्याची शक्यताही जवळपास मावळली आहे. हे अपयश या परिषदेचे मानले जाईल, हे आपल्या दृष्टीने नामुष्कीजनक खरेच. पण थोडा खोलात जाऊन विचार केल्यास यापेक्षा निराळे काही होणार नव्हते, याचीही जाणीव होईल. जी-२० परिषदेची संकल्पना जन्माला आली त्या काळात सदस्य देशांपैकी काहींचा जगातील विविध संघर्षांमध्ये विशिष्ट देशाला वा गटाला पाठिंबा जरूर होता. काही वेळा दोन परस्परविरोधी गटांना वेगवेगळय़ा देशांचा पाठिंबा असे. पण.. हे देश थेट कुणावरही आक्रमण करत नव्हते वा परस्परांच्या वादग्रस्त भूभागावर स्वामित्व सांगण्याच्या नावाखाली घुसखोरीही करत नव्हते. ही घडी विस्कटली रशिया आणि चीन यांनीच. २०१५मध्ये रशियाने युक्रेनचा प्रांत असलेल्या क्रिमियाचा ताबा मिळवला आणि जिनपिंग यांनी चीनच्या अध्यक्षपदी तिसऱ्यांदा नियुक्त झाल्यानंतर म्हणजे २०१९पासून राबवलेल्या आक्रमक धोरणांमुळे आर्थिक अरिष्ट, करोना संकट तसेच वातावरण बदलांच्या संकटांना रोखण्याआधी, या दोन पुंड देशांना वेसण घालणे जगातील प्रमुख सत्तांसाठी निकडीचे बनले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जरांगे पाटील आंदोलनावर ठाम!

## माझी अंत्ययात्रा नाहीतर आरक्षणाची विजययात्रा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मी मराठा समाजाला शब्द दिलेला आहे. आता शेवट झाला तरी चालेल. माझी अंतयात्रा तरी निघेल नाहीतर मराठा आरक्षणाची विजययात्रा निघेल. काळाने जगलो तुमचा, मेलो तर समाजाचा. त्यामुळे मी असा मेलेलो परवडेल, अशी ठाम भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली. आंतरवाली जराटी गावात मराठा आरक्षणासाठी त्यांचे गेल्या आठ दिवसांपासून आमरण उपोषण सुरु आहे.**

आज मंगळवारी राज्य सरकारच्या 3 मंत्र्यांचे शिष्टमंडळ त्यांच्यांशी चर्चा करण्यासाठी गेले. जवळपास अर्धा तास चर्चा झाली. परंतू जरांगे पाटील यांनी आपली भूमिका अगदी स्पष्ट करत उपोषण सोडणार नसल्याचे स्पष्ट केले. तर पुन्हा चार दिवसांची मुदतवाढ देतो, पण जीआर घेऊनच या, असे त्यांनी मंत्री गिरीश महाजन, मंत्री संदीपान भुमरे आणि मंत्री अतुल सावे यांना सांगितले. एकदा जीआर काढून हा प्रश्न सुटणार नाही. समितीशिवाय आपलं काम होणार नाही, असं गिरीश महाजन यांनी सांगितलं. त्यावर मनोज जरांगे यांनी तुम्ही म्हणजे सरकार नाही असं स्पष्ट सांगितले. मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मक आहे. आंदोलन एवढं ताणून चालत नाही, असं गिरीश महाजन म्हणाले. लाठीचार्ज करण्याचा आदेश देणाऱ्या मुख्य पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई केली आहे, असं गिरीश महाजन यांनी सांगितलं. सरकारच्या शिष्टमंडळाकडून मनोज जरांगे यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. यावेळी गिरीश महाजन यांनी थोडा वेळ लागेल, असं सांगितले. आम्ही सगळे ओबीसीमधून आहोत. पण आम्हाला आरक्षण दिले गेलेले नाही. आम्ही ओबीसींच्या यादीत 83 व्या क्रमांकावर आहोत. गिरीश महाजन म्हणाले की, अहो असे आंदोलन करुन चालत नाही. त्यावर मी 4 फेब्रुवारीपासून लढतोय, असं जरांगे पाटील म्हणाले. मरण्याची भाषा करायची नाही, असे राजेश टोपे म्हणाले. अहो, मरायची भाषा करत नाही, असं जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी मनोज जरांगे यांनी सरकारच्या शिष्टमंडळाला आणखी 4 दिवसांचा वेळ देतो, असे आश्वासन जरांगे यांनी दिले. मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, सरकार पॉझिटिव्ह आहे. काही तांत्रिक अडचणी आहेत. त्या दूर करण्यासाठी अधिकची वेळ लागत होती. यासंदर्भात चार दिवसांची मुदत दिली आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करतो. त्यानंतर नक्कीच काळजी घेतली जाईल. मात्र, यात तुमची तब्येत महत्त्वाची आहे. त्यामुळे जरांगे पाटलांना विनंती आहे की, पाणी,ज्युस घ्या. काळजी घ्या. पुढील चार दिवसात यावर सरकार सकारात्मक निर्णय घेईल. आम्ही सकारात्मक चर्चा केली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, गोळ्या फायर करणारे, मारहाण करणाऱ्या पोलिसांचे काय त्यांच्यावर कारवाई कधी होणार आहे. महिनाभर सर्व समिती अंबडला आणी अशी मागणी करत होतो. तेव्हा कमिटी काय करत होती. ओबीसी प्रमाणपत्राबाबत बोलत आहात.

पण मराठवाड्यातील काय गावातील लोकांना हे प्रमाणपत्र आहे. मग आम्हाला का दिले जात नाही. पन्नास टक्क्यांच्या आतमध्ये येऊ नका असा म्हणतात. मग मराठवाड्यातील मराठ्यांचे काय चुकले आहे? तुम्ही अद्यादेश काढा, समाज तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचेल. माझ्यावर दबाव अजिबात आणू नका, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केसा. गरज नसताना तुम्ही वेळ का मागता? असा प्रश्न जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की, जगलो तर तुमचा, नाहीतर मेलो तर समाजाचा? असा इशारा त्यांनी केला. कोणत्याही अहवालाची गरज नाही. गिरीश महाजन म्हणाले की, तुम्ही आम्ही सर्वजण कागदपत्रे तपासत आहोत. पण त्याला थोडा वेळ लागेल, त्यामुळे हट्ट धरणे योग्य राहणार नाही. आरक्षणाचा कीडा लय बेकार आहे. अहवाल आला आहे. मी तुम्हाला चार दिवस अधिकचे देतो. पण आमच्या समाजातील मुलांचे कल्याण करा, अशी विनंती करतो. मागणी मान्य केली. आर्डद साहेब यांनी ज्या समितीचा अहवाल दिला आहे. तो फक्त विचार करून आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली. मला चार दिवसात काहीच होणार नाही. मराठ्यांचे मुले आत्महत्या करत आहेत, तुम्ही आमचे देव आहात. चार दिवस थांबतो, आरक्षणाचा अद्यादेश आणा मी तेव्हाच शांत बसतो. मी माझ्या जातीशी अगदी प्रामाणिक आहे. तुमच्यामुळे मी चार दिवस माघारी जातो. माझ्या समाजाला मी विषाच्या खायीत लोटणार नाही. सलाईन, औषधी घेतो पण जीआर आणाच. 4 फेब्रुवारी पासून आम्ही लढाई करत आहोत. तरी देखील कायदा सुव्यवस्था अबाधित राहावे म्हणून हा शांततेचा मार्ग, तरी देखील तुम्ही आम्हाला मारले. असे जरांगे पाटील म्हणाले.



### मराठवाड्यातील मराठ्यांचे काय चुकले

» मनोज जरांगे पाटील म्हणाले की, गोळ्या फायर करणारे, मारहाण करणाऱ्या पोलिसांचे काय त्यांच्यावर कारवाई कधी होणार आहे. महिनाभर सर्व समिती अंबडला आणी अशी मागणी करत होतो. तेव्हा कमिटी काय करत होती. ओबीसी प्रमाणपत्राबाबत बोलत आहात. पण मराठवाड्यातील काय गावातील लोकांना हे प्रमाणपत्र आहे. मग आम्हाला का दिले जात नाही. पन्नास टक्क्यांच्या आतमध्ये येऊ नका असा म्हणतात. मग मराठवाड्यातील मराठ्यांचे काय चुकले आहे? तुम्ही अद्यादेश काढा, समाज तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचेल. माझ्यावर दबाव अजिबात आणू नका, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केसा.

# एकनाथ खडसेंची मस्ती जिरली नाही का?

## 10-10 मंत्रीपद घेताना तुम्हाला काही वाटलं नाही का ?

।मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात आता खोक्याचं राज्य सुरू झालेले आहे. पैसा, माज, मस्ती आली आहे. हा माज आणि मस्ती उतरवण्याची वेळ आली आहे, अशी टीका राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांनी राज्यसरकारवर केली. ते जळगावमध्ये आयोजित सभेत बोलत होते. त्यांच्या या घणाघाती टीकेला मंत्री गिरीश महाजन यांनी देखील प्रत्युत्तर दिले आहे. ते माध्यमांशी बोलत होते..**

गिरीश महाजन म्हणाले, एकनाथ खडसे यांची मस्ती अजून जिरली नाही का? आमची मस्ती काढत आहात. दहा दहा मंत्रीपद घेताना तुम्हाला काही वाटलं नाही का? तुमची मस्ती लोकांनी आणि सर्व बांधकाम व्यावसायिकांनी पाहिली आहे. त्याची फळ तुम्ही भोगत आहात.

आता उर बडवून काहीही उपयोग नाही. गिरीश महाजन पुढे बोलताना म्हणाले की, 30-35 वर्षे तुम्ही भाजपात होता. सगळ्यात जास्त पदं तुम्ही भोगली आहेत. आता दोन वर्षात तुम्हाला आमची मस्ती दिसली का? तुमची मस्ती लोकांनी उतरवली आहे. तुमचा विधानसभेत पराभव केला, दूध संघ आणि बँकेतून तुम्हाला हाकललं, तुमचं काय राहिलं आहे. आम्ही आमच्या ठिकाणी योग्य आहोत, असे महाजन म्हणाले. ओबीसींना आरक्षण दिले नाही तर मी राजकारण सोडून देईल, अजित पवारांना भाजपमध्ये स्थान नाही, विदर्भ वेगळा झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही, असा घोषणा करणारा भाजप नेता म्हणजे देवेंद्र फडणवीस आहे. पण प्रत्यक्षात असे झालेच नाही. हा माणूस खोटारडा आहे, असा घणाघात राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांनी केला.

ते जळगावात सभेला संबोधित करत होते. भाषणाला सुरूवात करण्यापूर्वी खडसेंनी 'लाव रे तो व्हिडिओ' ही स्टाईल वापरून फडणवीसांचे जुने व्हिडिओ दाखवून जोरदार टोलेबाजी केली.



### काही लोक पुरावे सादर करण्यात अपयशी

» गिरीश महाजन पुढे बोलताना म्हणाले की, तुमचा विधानसभेत पराभव केला, दूध संघ आणि बँकेतून तुम्हाला हाकललं, तुमचं काय राहिलं आहे. 30-35 वर्षे तुम्ही भाजपात होता. सगळ्यात जास्त पदं तुम्ही भोगली आहेत. आता दोन वर्षात तुम्हाला आमची मस्ती दिसली का? तुमची मस्ती लोकांनी उतरवली आहे. तुमचा विधानसभेत पराभव केला, दूध संघ आणि बँकेतून तुम्हाला हाकललं, तुमचं काय राहिलं आहे. आम्ही आमच्या ठिकाणी योग्य आहोत, असे महाजन म्हणाले.

# गधे खा रहे च्यवनप्राश!

## पुन्हा निवडून द्या, 500 कोटींची कामे होणार : गडकरी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गोगामेडी (हनुमानगड) येथे भाजपच्या परिवर्तन यात्रेच्या प्रारंभानिमित्त केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांच्यासाठी केलेल्या वक्तव्याने राजकीय चर्चा सुरू झाली आहे. गडकरी म्हणाले- पुन्हा एकदा भाजपची जुनी राजवट आठवा. आज मी मंदिरात गेलो होतो. मंदिराचे पुजारी आणि तिथले भाविक मला विचारत होते, हे मंदिर कोणी बांधले? राहुल कासवा (चुरु खासदार) माझ्या जवळ उभे होते. मी म्हणालो कोणी बनवले? ते म्हणाला- वसुंधरा यांनी बनवले. अहो, वसुंधरांनी तर केवळ 100 कोटींचे बांधले.**

पुन्हा निवडून द्या, 500 कोटी रुपयांची कामे करू. संपूर्ण मंदिर परिसराचा कायापालट होणार आहे. हा फरक आहे. गडकरी म्हणाले- आमचे एक कवी उत्तम कविता लिहायचे. हे मी कोणाला सांगत नाही. ते म्हणायचे, इथे गाढव, तिकडे गाढव, सगळीकडे गाढव. चांगल्या घोड्याला गवत नाही, गाढवे च्यवनप्राश खातात. समजणाऱ्याला एक इशारा पुरेसा आहे डबल इंजिन सरकार परत आणावे लागेल. राजस्थानचे नशीब बदलावे लागेल. गाव, गरीब, मजूर, शेतकरी यांचे भविष्य बदलावे लागेल. तरुणांसाठी रोजगार निर्माण करायचा आहे. एवढेच नाही तर राजस्थान आणि देशाचे भविष्य बदलून टाकायचे आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली नड्डा यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारला साथ द्या. ज्या पद्धतीने गडकरींनी वसुंधरा सरकारच्या जुन्या कामांची गणना करताना आणखी एक संधी देण्याचे आवाहन केले आहे. राजेंना संधी देण्याच्या आवाहनाला गडकरींच्या शैलीची जोड दिली जात आहे. घोडे आणि गाढवाची तुलना करून गडकरींनी विरोधकांवरही राजकीय टोला लगावला आहे. त्यांनी कोणाचेही नाव घेतले नाही. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री म्हणाले- दुहेरी इंजिनचे सरकार तयार झाले तर बुलेट ट्रेनच्या वेगाने धावेल. तुमचे नशीब बदलेल. तुमचे भविष्य बदलेल. शेतकरी आणि तरुणांचे भविष्य बदलेल. हीच विनंती करण्यासाठी मी इथे आलो आहे. राजस्थानमध्ये बदल करा, सरकार बदला. गडकरी म्हणाले- 2004 पासून अटलबिहारी वाजपेयींनी मला दोन चांगल्या संधी दिल्या. त्यांनी मला ब्राझीलला पाठवले, राम नाईक पेट्रोलियम मंत्री होते. मी इथेनॉल आणले आहे. वाजपेयींनी मला मुंबईहून फोन करून सांगितले की, तुम्ही अनेक उड्डाणपूल आणि महामार्ग बांधले आहेत. आता शेतकऱ्यांच्या हितासाठी गावे जोडण्याची योजना करा. त्यावेळी वसुंधरा राजे अटलजींच्या मंत्रिमंडळात मंत्री होत्या. त्यावेळी ग्रामीण विकास मंत्री सुंदरलाल पटवा होते. त्यावेळी मी तीन महिन्यांत अहवाल तयार करून वाजपेयीजींना दिला. हे माझे सौभाग्य आहे. या देशातील सर्वात प्रमुख योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक बनवण्याचा बहुमान मला मिळाला. राजस्थानातील अनेक गावांमध्ये रस्ते बांधण्यात आले. अटलबिहारी वाजपेयी नसते तर हा PMGSY झाला नसता. गावे रस्त्याने जोडलेली नाहीत. इंडियन ऑइलने पानिपतमध्ये पाचटापासून इथेनॉल बनवण्याचा प्लांट सुरू केला आहे. यातून बिटुमनही तयार करण्यात येत आहे. कारण मी अशा गोष्टी आधी सांगतो. ज्यावर लोक खूप नंतर विश्वास ठेवतात. शेतकऱ्यांनी तयार केलेल्या इंधनावर लवकरच विमानेही धावतील. हिरो, बजाज, टीव्हीएस स्कूटर आल्या आहेत. जे इथेनॉलवर चालेल. आता मी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या चेअरमनला फोन करून गावोगावी इथेनॉल पंप सुरू करण्यास सांगितले आहे. माझ्या घरी गाडी आहे. जो हायड्रोजनवर चालतो. आता हायड्रोजनचेही उत्पादन करून शेतकरी होणार करोडपती. मी स्वतः तीन साखर कारखाने चालवतो.



### शेतकरी अन्नदाता नसून ऊर्जा देणारा

आता आपला शेतकरी केवळ अन्नदाता नाही तर ऊर्जा देणाराही होणार आहे. आता उसाच्या रसापासून इथेनॉल बनवले जात आहे. इथेनॉल बाजरी, गहू, मका आणि ज्वारीपासून बनवले जात आहे. पेट्रोलमध्ये 20% इथेनॉल टाकण्यास सुरुवात झाली आहे. 10 दिवसांपूर्वी टोयोटा कंपनीची कार लॉन्च करण्याची संधी मिळाली. हे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या 100% बायो इथेनॉलवर चालते. जे 60 टक्के वीज निर्मिती करते. 40% इथेनॉल खर्च केले जाते. पेट्रोलची सरासरी किंमत काढली तर 120 रुपये प्रतिलिटर पेट्रोल 20 रुपयांवर येते.

# कलम 370वर सुनावणी पूर्ण; निर्णय राखून!

## 370वर केंद्राच्या निर्णयाला देण्यात आले होते आव्हान

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटवण्याविरोधात दाखल झालेल्या 23 याचिकांवरील सुनावणी पूर्ण झाली आहे. या खटल्यातील दोन्ही बाजूंचा युक्तिवाद 16 दिवस ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने (5 सप्टेंबर) आपला निर्णय राखून ठेवला.**

मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती संजय किशन कौल आणि न्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा समावेश असलेल्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. आज या प्रकरणाची सुनावणी सुरू होताच न्यायालयाने सर्वप्रथम नॅशनल कॉन्फरन्सचे नेते मोहम्मद अकबर लोन यांच्या प्रतिज्ञापत्रावर चर्चा केली. काश्मिरी पंडितांनी 3 सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात याचिकाकर्त्यांनी नॅशनल कॉन्फरन्सचे मोहम्मद अकबर लोन यांच्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. 'रूट्स इन काश्मीर' या संघटनेने दावा केला आहे की, लोन उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा देत आहेत. त्यांनी विधानसभेत पाकिस्तानच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. 4 सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान केंद्र सरकारने लोन यांना माफी मागण्यास सांगितले. मोहम्मद अकबर लोन यांनी भारतीय राज्यघटनेशी निष्ठा असल्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करावे, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्याच वेळी, कपिल सिब्बल म्हणाले की 2018 मध्ये जम्मू आणि काश्मीर विधानसभेत मोहम्मद अकबर लोन यांनी जे सांगितले होते त्याच्याशी ते वैयक्तिकरित्या सहमत नाहीत. वरिष्ठ अधिवक्ता व्ही गिरी यांनी सांगितले की, इंस्ट्रूमेंट ऑफ ऍक्सेसन (IOA) 27 ऑक्टोबर 1947 रोजी आहे. युवराज करण सिंग (राजा हरिसिंह यांचा मुलगा) याच्या घोषणेवर नजर टाका. क्राउन प्रिन्सकडे कलम 370 सह संपूर्ण राज्यघटना होती. एकदा 370 हटवल्यानंतर आणि जम्मू आणि काश्मीरचे एकीकरण पूर्ण झाल्यानंतर, सार्वभौमत्वाचे प्रतीक म्हणजे कायदा बनवणारी शक्ती. कायदे करण्याचे अधिकार केंद्र आणि राज्य यांच्याकडे आहेत क्राउन प्रिन्सकडे कोणतेही अवशिष्ट सार्वभौमत्व नव्हते. कलम 370 कायमस्वरूपी करण्याचे तर्क का? कोणते अधिकार द्यायचे? वरवर पाहता नाही. मग का? याचिकाकर्त्यांना नेमका कोणता अधिकार आहे? कलम 370(3) नुसार राष्ट्रपतींच्या अधिकाराचा वापर करता येत नाही असा युक्तिवाद केला जाऊ शकत नाही. तद्वतच 1957 मध्ये विधानसभा विसर्जित झाल्यानंतर ही तरतूद काढून टाकण्यात आली असती. हा वेगळा विषय आहे. यावर सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले की, संघवादाच्या या मुद्द्यावर 4 सप्टेंबरला बोलू. संविधान सभेची शिफारस करण्याच्या अधिकाराचा उद्देश संविधान सभेचा कार्यकाल रद्द




### दहशतवादी घटनांमध्ये 45.2% घट

जम्मू-काश्मीरला पूर्ण विकसित राज्य बनवण्यासाठी विकास होत आहे. सरकारच्या वतीने एसजी मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की 2018 ते 2023 च्या तुलनेत दहशतवादी घटनांमध्ये 45.2% आणि घुसखोरीमध्ये 90% घट झाली आहे. दगडफेकीसारख्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या समस्या 97% कमी झाल्या आहेत. सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या मृत्यूमध्ये 65% घट झाली आहे. 2018 मध्ये दगडफेकीच्या 1,767 घटना होत्या, ज्या आता 5 वर्षांत शून्य झाल्या आहेत. 2018 मध्ये संघटित बंदची संख्या 52 होती ती आता शून्य आहे.

# अपना राजा अकल से अंधा है भाई!

बॉलीवूडमध्ये ज्या चित्रपटानं प्रेक्षकांना हसवून लोटपोट केले त्या फुकरे नावाच्या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाचा तिसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता त्याचा ट्रेलर सोशल मीडियावर प्रदर्शित झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून फुकरे ३ या चित्रपटाची चर्चा आहे. कॉमेडी आणि सस्पेन्स या प्रकारातील चित्रपटानं प्रेक्षकांची मोठी पसंतीही मिळवली होती. रिचा चढ्ढा, पंकज त्रिपाठी, पुलकित सम्राट, यांच्या मुख्य भूमिका या चित्रपटामध्ये होता. खासकरुन तरुणाईच्या पसंतीस हा चित्रपट पडला होता. आता त्याच्या तिसऱ्या भागाचे वेध प्रेक्षकांना लागले आहेत. पोस्टरसोबतच त्यांनी रिलिज डेटचीही घोषणाही केली आहे. २ मिनिटे आणि ५१ सेकंदाच्या त्या व्हिडिओनं चाहत्यांना खूश केले आहे. तो ट्रेलर तुम्हाला पुन्हा दहा वर्षे मागे नेल्याशिवाय राहणार नाही. तुम्हाला आठवत असेल तर पहिल्या भागात चूचा आणि



हन्नीभाईची सुरुवात शाळेपासून होते. त्यात ते पहिल्यापासून फेल होत असल्याचे दिसून आले होते. या ट्रेलरमध्ये पुन्हा एकदा वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. आता प्रेक्षकांना नव्या चित्रपटामध्ये काय पाहायला मिळणार याची उत्सुकता आहे. फुकरेचा पहिला भाग हा २०१३ मध्ये आला होता. त्यानंतर त्याचा दुसरा भाग २०१७ आला होता. आता पाच वर्षांनंतर त्याचा तिसरा भाग प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट येत्या २८ सप्टेंबर २०२३ रोजी प्रदर्शित होणार आहे. बॉलीवूडमध्ये गेल्या काही महिन्यांपासून वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपटांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहेत. त्यात बड्या कलाकारांचे चित्रपट देखील आहे. दोन दिवसांनी किंग खान शाहरुखचा जवान प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून त्याची उत्सुकता आहे. त्यात विनोदी, क्राईम, सस्पेन्स विषयांवरील चित्रपटांना प्रेक्षकांची पसंती मिळत असल्याचे दिसून आले.

# कल के अंधेरो से निकल के

चित्रपट हे दृश्य स्वरूपात कथा सांगण्याचे तंत्र आहे. कॅमेरा जसा वेगवेगळ्या पद्धतीने वापरला जातो त्याचप्रमाणे प्रकाशाचा वापर चित्रपटातील प्रसंगानुसार अनेक प्रकारे केला जातो. दंगल चित्रपटात महावीर सिंग (आमीर खान) या पैलवानाला चार मुली झाल्यावर आपल्या मुलाला पैलवान बनवण्याचे त्याचे स्वप्न आता पूर्ण होऊ शकणार नाही, असा समज करून घेतल्यामुळे तो निराश मनाने हॉस्पिटलमधून घरी येतो. हॉस्पिटलमध्ये अनेक ट्यूबलाइटचा लख्ख प्रकाश आहे. 'ताऊजी' घरी येतात आणि भिंतीवर लावलेली स्वतः जिंकलेली पदके काढून टाकतात. त्यावेळी हरियाणामधील एका गावातल्या घरातल्या भिंतीवर एका ट्यूबलाइटचा जेवढा प्रकाश पडेल तेवढाच आपल्याला दिसतो, त्यामुळे निराशाजनक वातावरण जाणवते. स्वयंपाकघरात 'ताऊजी'ची बायको स्वयंपाक करते आहे, तिथे चुलीमध्ये पेटवलेल्या लाकडाचा प्रकाश दिसतो. आमीर खानच्या अर्ध्या चेहऱ्यावर नैसर्गिक अंधार दिसतो. एकूणच चित्रपटात हरियाणातील पहाट, दिवस -संध्याकाळचा वेगवेगळा प्रकाश, गावातल्या वेगवेगळ्या खोल्यांमधील बल्ब-ट्युबलाइटचे प्रकाश-अंधार त्या सर्व प्रसंगाची परिणामकारकता वाढवतात. अर्धसत्य चित्रपटाच्या सुरुवातीला पडद्यावर अंधार दिसतो, मग त्या काळ्या पडद्यावर पांढऱ्या रंगाची एक उभी पट्टी दिसते. त्यानंतर दुसरी पट्टी दिसते आणि हळूहळू त्यामधून सबइन्स्पेक्टर अनंत वेलणकरचे (ओम पुरी) एक चित्र तयार होते. हा अंधारामधून प्रकाशाचा खेळ चित्रपटातील अनेक प्रसंगांचे गांभीर्य वाढवतो. मुंबईत राहणाऱ्या अनंत वेलणकरला व्यायाम करणारा एक युवक गॅलरीमधून दिसतो, त्याचवेळी त्याला आपले लहानपण आठवते. नदीकाठी मुलाकडून व्यायाम करून घेणारा फौजदार वेलणकर (अमरीश पुरी) दिसताच प्रकाश योजना बदलते.





# कतरिनाने अटेंशन दिले तर विचित्र

विकी कौशलने अलिकडेच पत्नी कतरिना कैफसोबतच्या नात्याबद्दल सांगितले. यादरम्यान त्याने सांगितले की, रिलेशनशिपच्या सुरुवातीला कतरिना त्याला अटेंशन देत होती, यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. याचे त्याला आश्चर्य वाटायचे. मात्र कालांतराने कतरिनाची ओळख झाल्यानंतर तो कतरिनाच्या प्रेमात पडला. याशिवाय विकीने सांगितले की, तो आणि कतरिना सुरुवातीपासूनच नात्याबद्दल खूप गंभीर होते. दोघांनाही एकमेकांसोबत आयुष्य घालवायचे होते, म्हणून दोघांनी लग्न केले. अलीकडेच विकी 'वी आर युवा' च्या 'बी अ मॅन यार' ' या भागात पाहुणा म्हणून झळकला होता. यादरम्यान तो म्हणाला की, सुरुवातीला जेव्हा कतरिना त्याच्याकडे लक्ष द्यायची तेव्हा त्याला विचित्र वाटायचे. यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. रिलेशनशिपच्या सुरुवातीच्या टप्प्याबद्दल बोलताना विकी म्हणाला, 'सुरुवातीला हे वास्तव असू शकते यावर विश्वास ठेवणे मला कठीण वाटले. पण तिच्या प्रेमात पडण्याचे हे कारण नव्हते. जेव्हा मला कतरिनाचा स्वभाव आणि चांगुलपणा कळला तेव्हा मी तिच्या प्रेमात पडलो. जेव्हा मी तिला ओळखू लागलो, तेव्हा मला खात्री पटली की, मला माझे आयुष्य त्याच्याबरोबर घालवायचे आहे. विकी पुढे म्हणाला, 'सुरुवातीला जेव्हा कतरिना माझ्याकडे लक्ष द्यायची तेव्हा थोडे विचित्र वाटायचे. मला धक्काच बसला की हे कसे होत आहे? मला वाटायचे मीच का? मी तिच्याकडे फारसे लक्ष देत नव्हतो असे नाही, तर हे दोन्ही बाजुंनी होते.

# अफवांवर सनीची प्रतिक्रिया



बॉलीवूड अभिनेता सनी देओलने त्याचे वैयक्तिक आयुष्य नेहमीच गुपित ठेवले आहे. मात्र, सध्या तो 'गदर-2' चित्रपटाच्या यशानंतर दिलेल्या काही मुलाखतींमध्ये त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलत आहे. नुकत्याच झालेल्या काही मुलाखतींमध्ये सनीने अनेक रंजक किस्से शेअर केले आहेत. 'डर'च्या सेटवर दिग्दर्शकाशी झालेल्या वादानंतर त्याची जीन्स फाडणे असो किंवा क्रिकेट स्टेडियममध्ये मुलांना मारहाण करणे असो, अभिनेत्याने अनेकदा त्याची नाराजी व्यक्त केली आहे.



# विश्वचषकासाठी टीम इंडिया सज्ज!

## » रोहित शर्मा कर्णधार, सॅमसन आणि तिलक बाहेर

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

वनडे वर्ल्डकपसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी भारतीय कर्णधार रोहित शर्मासह संघाची घोषणा केली. भारतात ५ ऑक्टोबरपासून वर्ल्ड कपला सुरुवात होत आहे. भारताचा पहिला सामना ८ ऑक्टोबर रोजी चेपॉक मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. श्रीलंकेत सुरू असलेल्या आशिया चषकासाठी निवडलेल्या भारताच्या संघातील 18 सदस्यांपैकी 15 खेळाडूंनी विश्वचषक संघात स्थान मिळवले आहे. तिलक वर्मा, प्रसिद्ध कृष्णा आणि आशिया चषक संघात असलेले संजू सॅमसन यांना विश्वचषक संघात स्थान मिळवता आलेले नाही. वर्ल्ड कपमधील भारत-पाकिस्तान सामना १४ ऑक्टोबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. भारत 8 ऑक्टोबर रोजी चेन्नई येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विश्वचषकात आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. भारतात ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये 46 दिवसांचा एकदिवसीय विश्व असेल, ज्यामध्ये 48 सामने खेळले जातील. पहिला सामना 5 ऑक्टोबर रोजी अहमदाबादमध्ये मागील विश्वचषकातील विजेता आणि उपविजेता इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. 12 नोव्हेंबरपर्यंत ग्रुप स्टेजचे 45 सामने होतील. 15 आणि 16 नोव्हेंबरला दोन सेमीफायनल आणि 19 नोव्हेंबरला फायनल अहमदाबादमध्ये होणार आहे.

गतविजेत्या इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात 5 ऑक्टोबरला अहमदाबादमध्ये विश्वचषकाच्या चालू हंगामाची सुरुवात होणार आहे.










बॅटिंग ऑर्डर



ऑल राऊंडर



बॉलर

> आम्ही या तीन पॅरामीटर्सवर खेळाडूंचे मूल्यमापन करू आणि त्यानंतर प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणाचा समावेश करायचा हे ठरवू. रोहित म्हणाला की, वर्ल्ड कपमध्ये आमचा प्रयत्न सर्वोत्तम प्लेइंग इलेव्हनसह खेळण्याचा असेल. यावेळी युजवेंद्र चहल आणि संजू सॅमसनबद्दल बोलताना रोहित शर्मा म्हणाला, क्रिकेटमध्ये असे घडते. जेव्हा आम्ही संघ तयार करतो तेव्हा आम्हाला कोणालातरी बाहेर ठेवावे लागते.
>
> – रोहित शर्मा



### विश्वचषकासाठी भारतीय संघ

रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, इशान किशन, केएल राहुल, हार्दिक पांड्या (उपकर्णधार), सूर्यकुमार यादव, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव.